# मुंबई विद्यापीठ

केंद्रिय मुल्यांकन केंद्र, परीक्षा विभाग,
महात्मा ज्योतीराव फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई– ४०० ०९८.

दुरध्वनी क्र. – ०२२ २६५४ ३०३५ / २६५३ ०२८३
ईमेल - cap.exam@mu.ac.in

क्र. परीक्षा/कें.मु.कें./८३०/२०२२ दिनांक : २९ ऑक्टोबर, २०२२

विषय :– द्वितीय सत्र २०२२ (हिवाळी सत्र) मध्ये मुंबई विद्यापीठा अंतर्गत घेण्यात येणा–या परीक्षांचे मुल्यमापन OSM (On Screen Marking) प्रणालीतून करण्याबाबत....

**परिपत्रक :-**

मुंबई विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागाचे संचालक/विभाग प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/विद्यापीठ संचलित मानव्य विद्याशाखा, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा, आणि आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखांच्या महाविद्यालयाचे प्राचार्य, विद्यापीठाच्या दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक आणि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेंद्राचे संचालक/समन्वयक यांना या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, द्वितीय सत्र २०२२ च्या परीक्षा दि. ०४ नोव्हेंबर, २०२२ पासून सुरू होणार असून OSM प्रणाली मार्फत उत्तरपुस्तिकांचे मुल्यांकन करण्याचे काम दि. ०६ नोव्हेंबर, २०२२ पासून सुरू होणार आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ८९ अन्वये विद्यापीठाने निकाल वेळेत घोषित करणे बधंनकारक असून आपल्या सगळयांचे सहकार्य नेहमीप्रमाणे अपेक्षित आहे.

OSM प्रणाली यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी संस्था /महाविद्यालयांचे लक्ष पुढील सुचनेकडे वेधण्यात येत आहे.

१ विद्यापीठ परिपत्रक क्र. १६४८–अ /दि. २७ मार्च २०१८ नुसार प्रत्येक महाविद्यालयाला OSM सेंटर सुरू करणे बंधनकारक आहे.

२. मराठी व इंग्रजी भाषेत लिहिलेल्या उत्तरपुस्तिका वेगळया गठ्ठयात बांधून विद्यापीठात पाठविण्यात याव्यात.

३. L.D. (दिव्यांग) विद्यार्थ्यांच्या उत्तरपुस्तिकेच्या पानांवर L.D. चा शिक्का मारावा व Attendance sheet वर सुध्दा L.D. चा उल्लेख करावा.

४. कॉपी केसबाबत ज्युनिअर सुपरवायझर व सिनियर सुपरवायझरनी स्पष्ट मत मांडून विद्यापीठात पाठवताना स्वंतत्र पाकिटात पाठविणे आणि Attendance sheet वेगळी पाठवावी.

...२/–

# मुंबई विद्यापीठ

दुरध्वनी क्र – ०२२ २६५४ ३०३५ / २६५३ ०२८७
ईमेल - cap.exam@mu.ac.in

केंद्रिय मुल्यांकन केंद्र, परीक्षा विभाग,
महात्मा ज्योतीराव फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई– ४०० ०९८.



५. परीक्षा केंद्रावरील परीक्षेच्या दिवसाची उपस्थिती Attendance मे. मेरिट ट्रॅक या कंपनीच्या वेबसाईटवर त्याच दिवशी सायंकाळी ५.०० वाजेपर्यत भरणे[redacted] बंधनकारक आहे. तसेच परीक्षा केंद्रावरील Supervisior Report आणि Attendance हा Hard Copy च्या माध्यमातून पाठविणे बंधनकारक आहे. Hard Copy च्या प्रती परीक्षा केंद्राना परीक्षेपूर्वी पुरविण्यात येतील.

६. महाविद्यालयाने त्यांच्या विद्यार्थी संख्येच्या १.५ पट उत्तरपुस्तिका तपासणे बंधनकारक आहे. (कृपया परिपत्रक क्र. ४७७/२०१९/दिनांक २६ फेबुवारी २०१९) (उदा १०० विद्यार्थी संख्या, ५ विषय, ५०० उत्तरपुस्तिका म्हणजेच १.५ टक्के प्रमाणे ७५० उत्तरपुस्तिका तपासणे बंधनकारक आहे.) अन्यथा OSM (On Screen Marking) चे प्रमाणपत्र जे नावनोंदणी विभागाला (Enrollment Section) अनिवार्य आहे ते मिळू शकणार नाही. कृपया याची नोंद घेण्यात यावी.

७. CAP सेंटर अपडेट करण्यासाठी किंवा सुरू करण्यासाठी आणि फॅकल्टी नोंदणीसाठी महत्वाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

**1) URL Link for OSM :- https://uomportal.tracmarks.com/**

**2) Link for Faculty Registration:-https://uomportal.tracmarks.com/Register**

**3) Help Desk Number for Technical Issues:- 7406711095, 9513850016, 9513850026**

**4) Help Desk Number for Technical Issues:- 7406711095, 9513850016, 9513850026**

**5) For Attendance URL:- https://uomportal.tracmarks.com/**

**6) For Principle approver URL:- https://uomportal.tracmarks.com/**

८. महाविद्यालयातील CAP सेंटर update करण्यासाठी किंवा नव्याने सुरू करण्यासाठी मे. मेरिट ट्रॅक कंपनीच्या प्रतिनिधी महाविद्यालयांना दुरध्वनी वरून संपर्क साधणार असून महाविद्यालयांना विनंती आहे की, त्यांनी CAP सेंटर update करण्यासाठी मे. मेरिट ट्रॅक कंपनीच्या प्रतिनिधींना सहकार्य करावे.

डॉ. प्रसाद कारंडे
संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

Kamal pc/D/All draft & letters Marathi letter